# सायबर गुन्ह्यांमध्ये वर्षभरात दुप्पट वाढ



**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. २७ -** पुणे शहरात सायबर गुन्ह्यांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. शहरात २०१६ मध्ये २०७९ सायबर गुन्हे दाखल होते; तर २०१७ मध्ये आजवर चार हजार गुन्हे दाखल झाले आहेत. यामुळे सायबर क्राईमचा धोका दिवसेंदिवस वाढीस लागला असल्याचे आर्थिक गुन्हे शाखा व सायबर सुरक्षा विभागाचे पोलीस उपायुक्त मिलिंद पाटील यांनी व्यक्त केले.

क्विक हिल फाउंडेशन आणि पुणे शहर पोलीस यांच्या वतीने 'साय-फाय करंडक २०१७'चे आयोजन करण्यात आले आहे. यासंदर्भात माहिती देताना पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी सायबर सुरक्षा विभागाच्या पोलीस निरीक्षक राधिका फडके, क्विक हील टेक्नॉलॉजी लिमिटेड कंपनीचे वरीष्ठ कार्यकारी अधिकारी आणि व्यवस्थापकीय संचालक कैलास काटकर, एक्स्प्रेशन लॅबचे संचालक प्रदीप वैद्य उपस्थित होते.

पाटील म्हणाले, सायबर क्राईम हा सायलेंट क्राईम आहे. इतर गुन्ह्यासंदर्भात 'पोलीस काका' सारखे विविध उपक्रम व काही ॲपही आहेत.

| २०१७ सप्टेंबर पर्यंतच्या महत्त्वाच्या सायबर गुन्ह्यांची संख्या | |
|---|---|
| गुन्ह्याचा प्रकार | संख्या |
| बनावट कार्डचा वापराने बँकेतील पैसे ट्रान्सफर करून घेणे | २३५० |
| जॉब फ्रॉड | १९६ |
| लोन फ्रॉड | ५४ |
| मॅट्रिमोनियल, फेसबुक आणि गिफ्ट फ्रॉड | ७४ |
| फेक प्रोफाई, अश्लिल कमेंटस व इतर | २८३ |
| फेसबुक प्रोफाईल हॅक करणे | १३४ |
| फेसबुक हॅक करुन खंडणी | ८ |
| मेल हॅक करून पैसे ट्रान्सफर | २६ |
| **एकूण** | ३१२३ |

आजवर पारंपरिक गुन्ह्यांची संख्या ८० टक्के व सायबर गुन्ह्यांची संख्या २० टक्के इतकी होती. मात्र, लवकरच ही परिस्थिती बदलत असल्याचे दिसत असून सायबर गुन्ह्यांची संख्या ८० टक्के इतकी होण्याचा धोका दिसत आहे. यामुळे पोलिसांनाही त्या दृष्टीने तयारी करणे आवश्यक आहे. याबरोबरच गुन्ह्यांबाबत योग्य ती माहिती देऊन नेटीझंन्सनाही जागरूक करण्याची गरज आहे.

यावेळी कैलास काटकर म्हणाले, सायबर सुरक्षा या विषयावर क्विक हिल फाउंडेशनने आजवर ८ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व प्रशिक्षण दिले आहे. नेटीझन्सला डिजिटल जगताची काळी बाजू दाखवून देण्यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत.

## मिलिंद पाटील : २०१६ मध्ये २०७९ तर २०१७ मध्ये ४ हजार गुन्हे

यासाठी साय-फाय करंडकासारखे उपक्रम राबवले जात आहेत. या एक अंकी नाट्यमहोत्सवातून लोकांना डिजिटल जगातील धोके आणि समस्या समजतील त्याबरोबरच नाट्यकर्मींना त्यांची कला सादर करण्यासाठी एक मोठे व्यासपीठ उपलब्ध होणार आहे.

पुणे, मुंबई, कोल्हापूर, औरंगाबाद, गोवा आणि नागपूर या शहरांत सहा केंद्राच्या माध्यमातून सप्टेंबर २०१७ पासून साय-फाय करंडकाच्या अर्ज स्वीकृतीला सुरवात झाली आहे. यामध्ये १०० पेक्षा जास्त टीमने सहभाग घेतला. दोन महिने चाललेल्या निवडप्रक्रियेनंतर २१ ते २५ डिसेंबर या कालावधीत भरत नाट्यमंदिरात रंगणाऱ्या अंतिम फेरिसाठी २८ संघांची निवड करण्यात आली आहे. यामध्ये सायबर जगातले मानवी आयुष्य सोयीस्कर कितपत आणि धोकादायक कितपत? या संकल्पनेवरील नाटके सादर करण्यात येणार आहेत.